परिशिष्ट - ७ ब

जिल्हाधिकारी पुणे यांचेकडून

**क्रमांक- नपाप्र/१/निवडणूक/ जुन्नर प्ररअंमा/२०१६ दिनांक ९ /०८/२०१६**

राज्य निवडणूक आयुक्त,महाराष्ट्र यांचेकडील आदेश क्रमांक- एसइसी-१०९४/१६४/१९९४, दि.३१/१०/१९९४,आदेश क्रमांक रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.०७/का-०६, दिनांक ०७/०५/२०१६ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनिय १९६५ (१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४०) (यापुढे सदर अधिनियम म्हणून संबोधित केला) चे कलम १० (१) खाली **पुणे जिल्हयाचा जिल्हाधिकारी** निम्नोक्त आदेशाच्या अनुसूचित दर्शविल्याप्रमाणे **जुन्नर नगरपरिषद** क्षेत्र जितक्या प्रभागात विभागण्यात येईल त्या प्रभागांची संख्या व त्यांची व्याप्ती निश्चित करण्याचे आणि ज्या प्रभागांमध्ये अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या मागासवर्गासाठी जागा राखून ठेवण्यात येतील ते प्रभाग आणि त्याचप्रमाणे स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या मागासवर्गाच्या स्त्रियांसह) जागा राखून ठेवण्यात येतील ते प्रभाग दर्शविणारा क्रमांक **-पसन/कावि/६८३/२०१६ दिनांक ०२/०७/२०१६** च्या आदेशाचा प्रारूप मसुदा महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनिय १९६५ (१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४०) च्या कलम १० पोटकलम (१) च्या परंतुकामध्ये निश्चीत केलेल्या पध्दतीप्रमाणे उक्त नगरपरिषद क्षेत्रातील रहिवाश्यांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात आला होता.

त्यास अनुसरुन आलेल्या हरकतीचा सर्वकष विचार करून **मी सौरभ राव ,** पुणे जिल्हयाचा जिल्हाधिकारी उक्त अधिनियमाच्या कलम १०पोटकलम (१) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून निम्नोक्त आदेश देत आहे .

## आदेश

ज्याअर्थी महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ (सन १९६५ या महाराष्ट्र ४०) च्या कलम ९ पोटकलम - २ अन्वये मा. प्रादेशिक संचालक नगरपालिका प्रशासन, तथा विभागीय आयुक्त पुणे विभाग यांचेकडील आदेश क्र. महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग एक-अ - पुणे विभागीय पुरवणी मे १६, २०१६ (महाराष्ट्र शासन राजपत्र) च्या आदेशान्वये त्यांनी **जुन्नर नगरपरिषदेच्या** बाबतीत खाली दर्शविल्याप्रमाणे निवडावयाच्या सभासदांची संख्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरीकांचा मागासवर्ग यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या जागा व स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरीकांचा मागासवर्गाच्या स्त्रियांसाठी) राखून ठेवावयाच्या जागा निश्चीत केलेल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| (१) निवडावयाच्या सभासद संख्या | :- | १७ |
| (२) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरीकांचा मागासवर्ग यासाठी राखून ठेवावयाच्या जागांची संख्या | | |
| (अ) अनुसूचित जाती | :- | ०१ |
| (ब) अनुसूचित जमाती | :- | ०१ |
| (क) नागरीकांचा मागासवर्ग | :- | ०५ |
| (३) स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरीकांचा मागासवर्गाच्या स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन) | :- | ०९ |

(४) उपरोक्त क्रमांक ३ पैकी वरील क्रमांक २(अ), (ब) व (क) येथील जागांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरीकांचा मागासवर्गाच्या स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागांची संख्या खालीलप्रमाणे राहिल.

| | | |
|---|---|---|
| (अ) अनुसूचित जाती | :- | ०० |
| (ब) अनुसूचित जमाती | :- | ०० |
| (क) नागरीकांचा मागासवर्ग | :- | ०३ |

(५) स्त्रियांसाठी सर्वसाधारण जागा म्हणून राखून
ठेवावयाच्या जागांची संख्या (अनुक्रमांक ३
समोरील नमुद केलेल्या जागा - ४ समोरील नमुद केलेल्या जागा) :- ०६

२. त्याअर्थी आता राज्य निवडणुक आयुक्त महाराष्ट्र यांचेकडील आदेश क्रमांक एसईसी १०९४/१६४/१९९४ दि.३१ ऑक्टोबर १९९४, आदेश क्र.रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.०७/का-०६, दिनांक ०७/०५/२०१६ व मा. राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांचेकडील आदेश क्र.रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.१०/का-०६ दि.१५/०६/२०१६ व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १० पोटकलम १ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी **सौरभ राव, पुणे जिल्हयाचा जिल्हाधिकारी** याव्दारे उक्त नगरपरिषद क्षेत्र जितक्या भागात विभागण्यात येईल त्या प्रभागांची संख्या व त्यांची व्याप्ती या आदेशाच्या अनुसूचिमध्ये दर्शविल्याप्रमाणे निश्चित करीत असून ज्या प्रभागांमध्ये यथास्थिती अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागासवर्ग यांच्यासाठी व स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या मागासवर्गातील स्त्रियांसह) जागा राखून ठेवण्यात येतील ते प्रभाग निर्दिष्ट करीत आहे.

३. या आदेशाच्या तारखेच्या निकट नंतरच्या पुढील सार्वत्रिक निवडणूकीच्या प्रयोजनार्थ हा आदेश अंमलात येईल.

| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नाव, असल्यास | प्रभागाची व्याप्ती | जागा राखीव असल्यास कोणासाठी जसे अनु.जाती/अनु.जमाती/नागरिकांच्या मागासवर्गासाठी वा स्त्रियांसाठी (अनु.जाती स्त्रियांसाठी/अनु.जमाती स्त्रियांसाठी/नागरिकांच्या मागासवर्ग स्त्रियांसाठी धरुन |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १ | | **उत्तर** - कुकडी नदी<br>**पुर्व** - कुकडी नदी पासुन दक्षिणेकडे सर्व्हे नं.१५ व १४ ते ताजणे घर ते कागद कारखाना ते अब्दुल रेहमान बोरवाला घर ते कागदीवाडा मशिद पीछाडी<br>**दक्षिण** - कागदीवाडा मशिद पीछाडी बोळ पासुन पश्चिमेकडे व तिथुन उत्तरेकडे घानापुने घर ते पश्चिमेकडे अशोक खत्री घर पीछाडी दक्षिणेकडे शनि मंदिर ते कोंबड गल्ली ते उत्तरेकडे वरचा माळी वाडा मारुती मंदिर समोरील भागवत घर ते पश्चिमेकडे भाऊसाहेब लगड घर ते दक्षिणेकडे लोणार आळी जगदिश्वर बिल्डींग रविवार पेठ पिछाडी ते पश्चिमेकडे प्रणाम हाऊसिंग सोसा.ते आशिर्वाद बिल्डींग कल्याण पेठ च्या दक्षिण - पश्चिम कोप-यापासून उत्तरेकडे पाडळी सर्व्हे नं.२ मुंढे हायस्कुल रस्ता ते पश्चिमकडे नगर पालिका हद्द सर्व्हे नं.१०६(२)चा दक्षिण पश्चिम कोप-यापर्यत<br>**पश्चिम** - नगर पालिका हद्द सर्व्हे नं.१०६(२)चा दक्षिण पश्चिम कोप-यापासून ते उत्तरेकडे कुकडीनदी पर्यत सिसनं.५०८३ | १अ-अनुसूचित जमाती<br><br>१ब- सर्वसाधारण (स्त्री) |
| २ | | **उत्तर** - कुकडी नदी<br>**पुर्व** - कुकडी नदी बागायत सर्व्हे नं.४० पासून दक्षिणेकडे सिसनं.५०५२ ते नगरपालिका हद्द सिसनं.५०५१ पासून ते पुर्वेकडे सिसनं. ५००१ ते दक्षिणेकडे सिसनं.४८७३ डबडे शेती<br>**दक्षिण** - डबडे शेती ते पश्चिमेकडे शाळा क्र.४ ते जुना एसटी स्टॅण्ड ते पणसुंबा गणपती मंदिर चौक ते इंद्रप्रस्थ बिल्डींग ते नवरंग | २अ -अनुसूचित जाती<br><br>२ब-सर्वसाधारण (स्त्री) |